पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम.
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि. वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.07252-234834.
ई-मेल- sp.washim@mahapolice.gov.in
Website:www.washimpolice.gov.in

प्रेसनोट

दिनांक 09.04.2022

## शांतता पुर्वक जयंती उत्सव साजरा करा, आम्ही सहकार्य करू --- पोलीस अधिक्षक वाशिम

दिनांक 14.04.2022 रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्सव संपुर्ण जिल्हयात साजरा करण्यात येत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेणेकरीता तसेच शांततेत उत्सव साजरा व्हावा या उददेशाने पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम येथे मा पोलीस अधिक्षक यांच्या अध्यक्षतेखाली आज दिनांक 09.04.2022 रोजी 16.00 वा जिल्हास्तरीय शांतता समिती संवाद व आढावा बैठक पार पडली. सदर मिटींग करीता जिल्हयातील विविध भागातुन 150 च्या वर मान्यवर उपस्थित होते.

सर्वप्रथम मा अपर पोलीस अधिक्षक वाशिम यांनी सर्व उपस्थित मान्यवर यांना संबोधित केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंती निमीत्त शासनाचे निर्देशांबाबत माहिती दिली. सर्वांनी शांततेत उत्सव साजरा करावा. पारंपारीक मार्गांनीच मिरवणुक काढावी. इत्यादी बाबत मार्गदर्शन केले. उपस्थित लोकांनी जयंती उत्सव साजरा करतांना निर्माण होणारे प्रश्न मांडले. त्यामध्ये मुख्य प्रश्न डी.जे. वाजविण्याच्या परवानगी बाबत विचारण्यात आला. त्यावर उत्तर देतांना पोलीस अधिक्षक यांनी डी. जे. वाजविणेवर उच्च न्यायालयाची बंदी असल्याबाबत सांगितले.

पोलीस अधिक्षक यांनी जिल्हयात अलीकडील काळात घडलेल्या मुख्य कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या जातीय दंगलीच्या घटनांबाबत माहिती दिली. कायदा व सुव्यवस्थेची समस्या निर्माण करणाऱ्यांच्या विरूदध कठोर कारवाई करण्यात येईल असे सांगितले. ध्वनी पातळीच्या मर्यादेबाबत ध्वनि प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम 2000 मधील तरतुदींचे आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशांचे तंतोतंत पालन करावे. नविन प्रस्तावित मिरवणुकीस परवानगी देण्यात येणार नाही असे सांगुन अनेक गावातील सामाजिक पार्श्वभुमीचा आढावा घेतला.

वाशिम जिल्हयात दिनांक 10.04.2022 रोजी श्री रामनवमी उत्सव, दिनांक 14.04.2022 रोजी महाविर जयंती, दिनांक 15.04.2022 रोजी गुड फ्रायडे, दिनांक 16.04.2022 रोजी हनुमान जयंती, रमजान महिना इत्यादी महत्वाचे उत्सव असल्याबाबत माहिती दिली. या पार्श्वभुमीवर कायदा व सुव्यस्थेची परीस्थीती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत सर्वांना अवगत करण्यात आले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त निघणाऱ्या मिरवणुकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी तसेच सर्व उत्सव शांततेत पार पाडावेत असे आवाहन करण्यात आले.

उदया दिनांक 10.04.2022 रोजी वाशिम जिल्हयात सर्वत्र श्री रामनवमी उत्सव साजरा करण्यात येत आहे. श्री रामनवमी उत्सव निमित्त वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने 03 पोलीस उपअधिक्षक, 15 पोलीस निरीक्षक, 50 सहायक पोलीस निरीक्षक/पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे अधिकारी, 500 पोलीस अंमलदार 450 होमगार्ड इतका बंदोबस्त नेमण्यात आला आहे. श्री रामनवमी उत्सव शांततेत साजरा करा असे वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे आपणास आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस निरीक्षक,
जिल्हा विशेष शाखा,वाशिम.